MHAK060008372016

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०३.०३.२०१६ |
| नोंदणी तारीख | : | ०४.०३.२०१६ |
| निर्णय दिनांक | : | ०६.०३.२०२६ |
| कालावधी | : | व म दि<br>१० ०० ०३ |

**सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, अकोट, जिल्हा अकोला.**
(पिठासीन अधिकारी महेश एस. काळे)

**नियमीत दिवाणी दावा क्रं. ३१/२०१६** **निशाणी क्रं. ५९.**

**बजरंग दिनकर मोहोड,**
वय अं. २९ वर्षे, व्यवसाय– वाहन चालक,
रा. पाटसुल, ता. अकोट, जि. अकोला. ..... **वादी.**

**– विरुध्द –**

**जावेद खाँ रउफ खाँ,**
वय अं. ४३ वर्षे, व्यवसाय– वाहन चालक,
रा. शाहीन कॉलनी, अकोट, ता. अकोट,
जिल्हा अकोला. ..... **प्रतिवादी.**

**दावा कराराची पुर्तता करण्यासाठी पर्यायाने ॲटो परत मिळण्यासाठी व नुकसान भरपाईसाठी.**

---

श्री. डी.एम. कुटे, विद्वान अधिवक्ता वादी करीता.
श्री. एस.जी. कुळकर्णी, विद्वान अधिवक्ता प्रतिवादी करीता.

---

**न्या य नि र्ण य**
( निकाल तारीख ०६ मार्च, २०२६)

प्रस्तुतचा दावा वादीने दावा कराराची पुर्तता करण्यासाठी पर्यायाने ॲटो परत मिळण्यासाठी व नुकसान भरपाई मिळण्याकरीता दाखल केला आहे.

०२. वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, वादी हा MH–30 AB–2841 TATA Ace या मालवाहु ॲटोचा नोंदणीकृत मालक आहे. सदर ॲटोचा इंजीन नं. 275IDI06LWYSN1747 व चेचीस नं. MAT445082DZP81923 हा आहे. वादीने सदर ॲटो चोला मंडलम् फायनान्स कंपनी यांच्या आर्थिक सहाय्याने सन २०१३ मध्ये विकत घेतला होता. सदर कर्जाची परतफेड दरमहा रू.१०,०००/– प्रमाणे करावयाची होती. प्रतिवादी हा सुध्दा वाहन चालक असल्याने वादी व प्रतिवादीचे मित्रत्वाचे संबंध होते.

०३. वरील ॲटो हा क्रिम कलरचा असून ॲटोवर चोला मंडलम् फायनान्स, अकोला यांचे कर्ज होते. वादीकडून दररोज ॲटो चालविणे होत नव्हते, ही बाब वादीने प्रतिवादीला सांगितली असता प्रतिवादी वादीला म्हणाला की, सदर ॲटो वादीने प्रतिवादीला विक्री करावा व प्रतिवादी हा कर्जाच्या किस्तीची रक्कम दरमहा रु.१०,०००/– प्रमाणे चोला मंडलम् फायनान्सकडे भरणा करण्यास तयार आहे.

०४. प्रतिवादीने वादीस विश्वासात घेतल्याने तसेच वादी व प्रतिवादीचे संबंध असल्याने वादीने प्रतिवादीच्या बोलण्यावर विश्वास ठेवला होता. दिनांक २७.०५.२०१५ रोजी रु.३,७६,०००/– चे मोबदल्यात वादीने प्रतिवादीला ॲटो विकण्याचा सौदा पक्का केला होता. त्यावेळी प्रतिवादीने साक्षीदारांसमक्ष वादीला रु.२६,०००/– नगदी देवून चोला मंडलम् फायनान्स यांच्या दरमहा रु.१०,०००/– प्रमाणे ३५ किस्तींचा भरणा प्रतिवादीने करावा असे ठरले होते. त्या प्रमाणे वादीने प्रतिवादीला साक्षीदारांसमक्ष दिनांक २७.०५.२०१५ रोजी अकोट येथे मालवाहु ॲटो विक्रीचा करारनामा लिहुन दिला. प्रतिवादीने वादीस चोला मंडलम् फायनान्सच्या किस्तींची रक्कम दरमहा भरेल असा विश्वास दिल्याने वादीने प्रतिवादीला ॲटो विक्री करुन ताब्यात दिला होता. परंतु वादीच्या असे निदर्शनास आले होते की, प्रतिवादीने दिनांक २७.०५.२०१५ नंतर एकही किस्तीचा भरणा केलेला नाही.

०५. दिनांक १३.०९.२०१५ रोजी वादी हा प्रतिवादीकडे कर्ज रकमेचा भरणा का करत नाही, अशी विचारणा करण्यासाठी गेला असता प्रतिवादीने वादीला म्हटले की, वादीने ॲटो विक्री केला असून प्रतिवादी हा कर्ज रकमेचा भरणा करणार नाही व वादीकडून जे होईल ते करुन घ्यावे.

०६. प्रतिवादीने वादीसोबत बनवाबनवी करुन तसेच प्रतिवादी हा कर्ज रकमेचा भरणा करेल असे सांगुन वादीला सदर ॲटो हा प्रतिवादीच्या ताब्यात देण्यास प्रोत्साहीत केले. प्रतिवादी हा कराराप्रमाणे फायनान्स कंपनीकडे कर्जाची किस्तीची रक्कम भरत नसल्याने वादीने प्रतिवादी विरुध्द पोलीस स्टेशन, अकोट येथे रिपोर्ट दिला होता. सदर प्रकरण चौकशीत असतांना प्रतिवादीने ॲड. योगेश पुराडउपाध्ये यांचे मार्फत दिनांक ०१.१०.२०१५ रोजी वादीला नोंदणीकृत डाकेने नोटीस पाठविली होती.

०७. प्रतिवादीने हेतु पुरस्सर वादीचा ॲटो घेवून व कर्ज रकमेची परतफेड न करता परस्पर विक्री करुन वादीची फसवणुक केल्याबाबत वादीने प्रतिवादी विरुध्द पोलीस स्टेशन, अकोट येथे रिपोर्ट दिला होता. त्यावेळेस प्रतिवादीने ॲटो त्याच्याच ताब्यात असल्याचे सांगुन ॲटो वापरलेल्या कालावधीची थकीत रक्कम फायनान्स कंपनीकडे भरुन वादीला ॲटो परत देण्याची तयारी दर्शविली होती. म्हणुन वादीने प्रतिवादीला पाठविलेल्या दिनांक ०१.१०.२०१५ रोजीच्या नोटीसला उत्तर दिले नव्हते. परंतु प्रतिवादीने त्याच्या वरील म्हणण्याची पुर्तता केली नव्हती. त्यानंतर पोलीस स्टेशन अधिकारी अकोट शहर यांनी दिनांक ०७.११.२०१५ रोजी वादीला समजपत्र देवून प्रकरण दिवाणी स्वरुपाचे असल्याने विद्यमान न्यायालयात दाद मागावी, असे सुचविले होते.

०८. प्रतिवादीने दिनांक ०१.१०.२०१५ रोजीच्या नोटीसनुसार कराराच्यावेळी प्रतिवादीने वादीला दिलेली रक्कम रु.२६,०००/– व्याजासकट परत

करण्याची मागणी केली होती. मात्र प्रतिवादीने वादीच्या वापरत असलेल्या ॲटोबद्दल नोटीसमध्ये काहीही नमुद केलेले नव्हते. दिनांक २७.०५.२०१५ पासून फायनान्स कंपनीच्या किस्तीचा भरणा प्रतिवादीने न केल्याने विनाकारण वादीवर किस्त रकमेचे व्याज वाढले आहे. म्हणुन वादीने प्रतिवादीला दिनांक २७.०१.२०१६ रोजी नोंदणीकृत डाकेने नोटीस पाठवून दिनांक २७.०५.२०१५ रोजीच्या करारनाम्याप्रमाणे प्रतिवादीकडे राहीलेली रक्कम रु.३,५०,०००/– चा त्यावरील व्याजासह भरणा चोला मंडलम् कंपनीकडे करावा अथवा सदर रक्कम वादीला द्यावी व सदर रक्कम भरण्याची प्रतिवादीची तयारी नसल्यास दिनांक २७.०५.२०१५ रोजी पासून दरमहा रु.१०,०००/– ॲटोचे भाडे म्हणुन ॲटोचा प्रत्यक्ष ताबा देईपर्यंत वादीला द्यावे, असे सुचित केले होते. सदर नोटीसवर प्रतिवादीने हक्क न सांगितल्याने नोटीसचे बंद पाकीट वादीच्या वकीलांना परत आले होते.

०९. प्रतिवादीने करारानुसार चोला मंडलम् फायनान्स कंपनीकडे कर्ज रकमेच्या किस्तीचा भरणा न केल्याने तसेच वादीचा ॲटो वादीला परत न केल्याने वादीला सदर दावा करणे भाग पडले आहे. सदर दावा प्रलंबीत असतांना करारानुसार प्रतिवादीने चोला मंडलम् फायनान्स कंपनीकडे कर्ज हप्त्याचा भरणा करुन कर्ज रकमेची परतफेड करणे आवश्यक होते. प्रतिवादीने कर्ज रकमेचा भरणा न केल्यामुळे चोला मंडलम फायनान्स कंपनीचे ॲटोचे कर्जाकरीता गहाण दिलेली वादीचे वडील दिनकर वामनराव मोहोड यांची मौजे पाटसुल, ता. अकोट, जिल्हा अकोला येथील शेत गट नं.१२३ क्षेत्रफळ ५७ आर ही शेत जमीन जप्त करुन विक्रीची कार्यवाही सुरु केली होती. म्हणुन वादीने संपुर्ण कर्ज रकमेचा व्याजासह भरणा केला आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी दरम्यानच्या दिनांक २७.०५.२०१५ रोजीच्या करारानुसार ॲटोच्या मोबद्ल्याची रक्कम रु.३,५०,०००/– व्याजासह मिळण्यास वादी पात्र आहे. त्यामुळे हा दावा मंजुर करण्यात यावा अशी मागणी वादीने केली.

१०. प्रतिवादीला या दाव्यातील समन्स लागु झाल्यानंतर तो या दाव्यात हजर झाला व त्याने त्याचा लेखी जबाब निशाणी क्रं.२४ वर दाखल केला. त्याने त्याचे लेखी जबाबात ही बाब मान्य केली आहे की, दिनांक २७.०५.२०१५ रोजी साक्षदार धनंजय नारे, प्रशांत कोरडे व गजानन सिरस्कार यांचे समक्ष रु.३,३६,०००/– चे मोबदल्यात वादीने त्याचा ॲटो प्रतिवादीला विकण्याचा सौदा पक्का केला होता. त्यावेळी प्रतिवादीने साक्षदारासमक्ष वादीला रु.२६,०००/– नगदी दिले. त्याने त्याचे लेखी जबाबात पुढे असेही कथन केले की, त्याने वादीकडून दिनांक २७.०५.२०१५ च्या विक्री करारनाम्या प्रमाणे वादीच्या मालकीची गाडी ही वादीला नगदी रु.२६,०००/– देवून खरेदी केली होती. सदर गाडीवर चोला मंडलम्, अकोला यांचे कर्ज होते ते कर्ज दरमहा रु.१०,०००/– प्रमाणे ३५ किस्तीमध्ये भरण्याचे ठरले होते. तसेच फायनान्स कंपनीने गाडी ओढून नेल्यास प्रतिवादीला कोणताही हक्क राहणार नाही, असेही ठरले होते. दिनांक २७.०५.२०१५ रोजी वादीने प्रतिवादीला गाडीचा ताबा दिला होता. सदर गाडीचा विक्रीचा करारनामा हा नोटरी पब्लीक यांच्याकडून अटेस्ट करुन घेतला होता. परंतु दिनांक ३०.०९.२०१५ रोजी अचानकपणे वादीने प्रतिवादीला प्रत्यक्ष भेटून गाडी परत मागीतली व गाडी परत न दिल्यास वादीने प्रतिवादीला चोरीची केस करीन, अशी धमकी दिली. प्रतिवादीने वादीला रु.२६,०००/– व्याजासकट परत कर मी तुला गाडी आणुन देतो, असे म्हटले असता वादीने प्रतिवादीला धमकी दिली की, मी तुला पाहुन घेईन, पोलीस स्टेशन द्वारे तुझे सर्व पैसे वसुल करुन घेईन. सदर घटनेनंतर प्रतिवादीने वादीला दिनांक ०१.१०.२०१५ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने वकीलामार्फत नोटीस पाठविली परंतु वादीने सदर नोटीसचे कोणतेही उत्तर पाठविले नाही व त्यानुसार वागलादेखील नाही. या उलट वादीने पोलीस स्टेशनमध्ये खोटा रिपोर्ट देवून प्रतिवादीला विनाकारण त्रास दिला. त्या वेळेसदेखील प्रतिवादी हा वादीला सदर गाडी परत देण्यास तयार होता.

११. प्रतिवादीने त्याचे लेखी जबाबात पुढे असेही कथन केले आहे की, त्याने वादीची वाट पाहीली परंतु वादी प्रतिवादीचे पैसे घेवून गाडी परत नेण्यासाठी आलाच नाही. त्या कारणाने नाईलाजास्तव प्रतिवादीने सदरची गाडी ही याच अटीवर गोलु भिकु अजनेरिया, रा. परतवाडा, ता. अचलपुर, जिल्हा अमरावती यांना विकली. त्यामुळे सदर गाडीवर असलेले फायनान्स हे भरण्याची जबाबदारी प्रतिवादीवर नाही. श्री गोलु भिकु अजनेरिया यांना या दाव्यामध्ये वादीने प्रतिवादी म्हणुन लावावयास हवे होते. या दाव्यामध्ये प्रतिवादीला विनाकारण पार्टी बनवुन विनाकारण त्रास देण्यात आला आहे. प्रतिवादीने गोलु भिकु अजनेरिया याला ऑटो विकला आहे. त्यामुळे गोलु भिकु अजनेरिया याला सदर दाव्यामध्ये पक्षकार म्हणुन जोडणे आवश्यक होते. परंतु वादीने तसे केले नाही. त्यामुळे वादीचा दावा खारीज होण्यास पात्र आहे. सदर प्रकरणामध्ये वादीने ऑटो विकण्यापुर्वी कोणतीही काळजी घेतली नाही. तसेच फायनान्स कंपनीला ऑटो विकण्याची माहिती सुध्दा दिली नाही. वादीने सदर दावा विनाकारण प्रतिवादीला त्रास देण्याच्या उद्देशाने दाखल केला आहे. त्यामुळे वादीचा दावा हा खर्चासह खारीज करण्यात यावा.

१२. वादी व प्रतिवादीचे कथने विचारात घेवून माझे विद्वान पिठासीन पूर्व अधिकारी यांनी निशाणी क्रं.२५ वर मुद्दे काढले. सदरचे मुद्दे पुढीलप्रमाणे असुन त्यावरील माझे निष्कर्ष मी त्यांच्यासमोर नोंदविले असून त्यांची कारणे त्याखाली दिलेल्याप्रमाणे आहेतः–

| **अ.क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी सिध्द करतो काय की, त्याने सन २०१३ मध्ये चोला मंडलम् फायनान्स कंपनीच्या आर्थिक सहाय्याने ऑटो विकत घेतला होता ? | **होकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| २. | वादी सिध्द करतो काय की, ॲटो प्रतिवादीला विकतांना प्रतिवादीने दरमहा रु.१०,०००/– प्रमाणे ३५ किस्तीचा भरणा चोला मंडलम् फायनान्सकडे जमा करावे, असे त्यांचेमध्ये ठरले होते ? | **होकारार्थी** |
| ३. | वादी असे सिध्द करतो काय की, प्रतिवादीच्या ताब्यात ॲटो दिल्यावर त्याने दिनांक २७.०५.२०१५ रोजी नंतर किस्तीचा भरणा केला नाही ? | **होकारार्थी** |
| ४. | वादी सिध्द करतो काय की, रु.३,५०,०००/– व त्यावरील व्याज चोला मंडलम् कंपनीकडे जमा करावे अथवा ती रक्कम वादीला द्यावी, असे त्याने प्रतिवादीला सुचीत केले ? | **होकारार्थी** |
| ५. | वादी सिध्द करतो काय की, प्रतिवादीने चोला मंडलम् कंपनीस रक्कम न दिल्यास दिनांक २७.०५.२०१५ रोजी पासून दरमहा रु.१०,०००/– ॲटोचे भाडे म्हणुन ॲटोचा प्रत्यक्ष ताबा देईपर्यंत वादीला द्यावे, असे सुचीत केले ? | **होकारार्थी** |
| ५–अ | वादी असे सिध्द करतो काय की, त्याने संपुर्ण कर्जाच्या रकमेचा व्याजासह भरणा केला आहे व त्यामुळे तो ॲटोच्या मोबदल्याची रक्कम रु.३,५०,०००/– ही प्रतिवादीकडून व्याजासह मिळविण्यास पात्र आहे ? | **होकारार्थी** |
| ६. | वादी प्रार्थने प्रमाणे हुकूमनामा मिळविण्यास पात्र आहे ? | **होकारार्थी** |
| ७. | काय आदेश व हुकूमनामा ? | **दावा अंतिम आदेशाप्रमाणे खर्चासह मंजुर करण्यात येतो.** |

१३. वादीने त्याचे कथन सिध्द करण्याकरीता साक्षीदार क्रं. १ म्हणुन स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रं.३९ प्रमाणे सादर केले. त्यानंतर वादीने कोणताही पुरावा दिलेला नाही म्हणुन दिनांक १९.११.२०२५ रोजी निशाणी क्रं.१ खाली आदेश पारीत करुन त्याचा पुरावा बंद करण्यात आला. वादीने त्याचा दावा सिध्द करण्यासाठी गाडी विक्रीच्या करारनाम्याची प्रत निशाणी क्रं.४३, प्रतिवादीने वादीला पाठविलेली दिनांक ०१.१०.२०२५ रोजीची नोटीस निशाणी क्रं.४४, वादीने त्याचे वकीलाचे मार्फत प्रतिवादीला पाठविलेल्या दिनांक २७.०१.२०१६ रोजीच्या नोटीसीची स्थळप्रत निशाणी क्रं.४५, सदर नोटीसीबाबतची पोस्टाची पावती निशाणी क्रं.४६, त्या नोटीसचा परत आलेला लिफाफा व त्यातील नोटीस निशाणी क्रं.४७, दिनांक १३.०९.२०१५ रोजी वादीने पोलीस ठाणे, अकोट शहर येथे दिनांक १३.०९.२०१५ रोजी दिलेल्या कैफीयतीची स्थळप्रत निशाणी क्रं.४८ व त्या कैफीयतीच्या अनुषंगाने वादीला मिळालेले समजपत्र निशाणी क्रं.४९ दिनांक ०१.०६.२०१६ रोजी चोलामंडलम इन्व्हेस्टमेंट व फायनान्स कंपनीने वादीला पाठविलेली नोटीस व त्याचा लिफाफा निशाणी क्रं.५० व ५१ कागदोपत्री हा पुरावा दाखल केला आहे.

१४. तसेच प्रतिवादी याने या प्रकरणात त्याचे कथन सिध्द करण्याकरीता साक्षीदार क्रं.१ म्हणुन स्वत:चे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रं.५७ प्रमाणे सादर केले. त्यानंतर प्रतिवादीने निशाणी क्रं.५८ ही पुरसीस दाखल करुन त्याचा पुरावा बंद केला. प्रतिवादीने त्याचे बचावाचे समर्थनार्थ कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

१५. उभयपक्षांचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादीचे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, वादी व प्रतिवादी दरम्यानचा निशाणी क्रं.४३ हा ॲटो विक्रीचा करार सिध्द झाला आहे. त्या करारानुसार प्रतिवादीने फायनान्स कंपनीच्या किस्तींचा भरणा केला नाही, त्याद्वारे प्रतिवादीने सदर कराराचा भंग केला आहे. प्रतिवादीने त्याच्या निशाणी क्रं.५७ वर नोंदविलेल्या पुराव्यात ही बाब मान्य केली

आहे की, त्याचे व वादीचे दरम्यान जो ॲटो खरेदी विक्रीचा करारनामा झाला होता त्या नुसार त्याने रु.३,७६,०००/– या मोबद्ल्यात वादीचे वाहन खरेदी करण्याचे ठरले होते व त्यापैकी त्याने केवळ रु.२६,०००/– ही इसाराची रक्कम वादीला दिली आहे. सदर करारनाम्यानुसार प्रतिवादीला चोलामंडलम फायनान्सच्या कर्जाच्या फेडीसाठी दरमहा रु.१०,०००/– या रकमेच्या एकूण ३५ किस्त भरायच्या होत्या व त्यापैकी एकही किस्त प्रतिवादीने भरलेली नाही, ही बाब सुध्दा प्रतिवादीने त्याचे उलटतपासात मान्य केली आहे. तसेच प्रतिवादीने ही बाब सुध्दा मान्य केली आहे की, त्याने वादीचा वादातील ॲटो गोलु भिकु अजनेरीया याला विकला आहे व सदर गोलु अजनेरीया याचे कडून मिळालेल्या मोबद्ल्यातील कोणतीही रक्कम त्याने वादीला दिलेली नाही. सदर परीस्थतीत भारतीय पुरावा कायद्याचे कलम ५८ अन्वये प्रतिवादीला मान्य असलेल्या बाबी हया या दाव्यात सिध्द झाल्या आहेत, असे गृहीत धरणे आवश्यक आहे. तसेच अभिलेखावरील एकंदरीत कागदोपत्री पुरावा व वादी व प्रतिवादीचा शपथेवर नोंदविण्यात आलेला पुरावा यावरुन ही बाब सिध्द होत आहे की, प्रतिवादीने कराराचा भंग केला आहे व त्यामुळे वादीचे मोठे नुकसान झाले असल्यामुळे वादी हा नुकसान भरपाईची रक्कम व्याजासह मिळण्यास पात्र आहे. म्हणुन वादीचा दावा मंजुर करण्यात यावा.

१६. या उलट प्रतिवादीचे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, या दाव्यास आवश्यक पक्षकाराला न जोडण्याच्या तत्वाची बाधा येते. आज रोजी वादातील ॲटो हा गोलु भिकु अजनेरीया यास विक्री केलेला आहे, त्यामुळे सदर गोलु अजनेरीया हा या दाव्यास आवश्यक पक्षकार आहे. तसेच वादी व्यतीरिक्त वादीने या दाव्यात इतर कोणताही साक्षीदार तपासलेला नाही. तसेच वादातील ॲटो हा ब–याच कालावधीपुर्वी पासून दुस–या इसमाच्या म्हणजेच गोलु अजनेरीया याचे ताब्यात आहे. त्यामुळे प्रतिवादी हा सदर कालावधीसाठी वादीला ॲटोबाबत नुकसान भरपाई देणे लागत नाही. प्रतिवादी हा वादीला त्याचा ॲटो परत देण्यास तयार होता, परंतु वादी हा सदर ॲटोचा ताबा घेण्यासाठी प्रतिवादीकडे आला नाही. त्यामुळे आता वादीला प्रतिवादीकडून

नुकसान भरपाई मागता येणार नाही. त्यामुळे वादीचा दावा खर्चासह नामंजुर करण्यात यावा.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रं. १ ते ६ बाबत –**

१७. मुद्दा क्रं. १ ते ६ चे निष्कर्ष हे ऐकमेकांवर विसंबुन आहे. त्यामुळे विवेचनाची पुर्नावृत्ती टाळण्याकरीता मुद्दा क्र. १ ते ६ चे विवेचन एकत्रीतरित्या करण्यात येत आहे.

१८. वादीने त्याचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्रं.३९ वर दाखल करुन त्याच्या दाव्यातील कथनांचे शपथेवर पुर्नकथन केले आहे. वादीने शपथेवर असे कथन केले आहे की, त्याने सन २०१३ मध्ये चोला मंडलम् फायनान्स कंपनीच्या आर्थिक सहाय्याने ॲटो विकत घेतला होता. वादीने तो ॲटो प्रतिवादीला विकतांना प्रतिवादीने दरमहा रु.१०,०००/– प्रमाणे ३५ किस्तीचा भरणा चोला मंडलम् फायनान्सकडे जमा करावे, असे वादी व प्रतिवादी यांचेमध्ये ठरले होते. वादीने शपथेवर असेही कथन केले आहे की, त्याने प्रतिवादीच्या ताब्यात त्याचा ॲटो दिल्यावर प्रतिवादीने दिनांक २७.०५.२०१५ रोजी नंतर किस्तीचा भरणा केला नाही. त्यामुळे रु.३,५०,०००/– व त्यावरील व्याज चोला मंडलम् कंपनीकडे जमा करावे अथवा ती रक्कम वादीला द्यावी, असे त्याने प्रतिवादीला नोटीस पाठवुन सुचीत केले होते. तसेच प्रतिवादीने चोला मंडलम् कंपनीस रक्कम न दिल्यास दिनांक २७.०५.२०१५ रोजी पासून दरमहा रु.१०,०००/– ॲटोचे भाडे म्हणुन ॲटोचा प्रत्यक्ष ताबा देईपर्यंत वादीला द्यावे, असेही वादीने प्रतिवादीला सुचीत केले होते. परंतु तरी देखील प्रतिवादीने कर्जाचा भरणा केला नाही म्हणुन वादीने संपुर्ण कर्जाच्या रकमेचा व्याजासह भरणा केला आहे व त्यामुळे तो ॲटोच्या मोबदल्याची रक्कम रु.३,५०,०००/– ही प्रतिवादीकडून व्याजासह मिळविण्यास पात्र आहे.

१९. वादीच्या पुराव्यातील शपथेवरील कथनास निशाणी क्रं.४३ ते ५२ हा कागदोपत्री पुरावा दुजोरा देत आहे. तसेच प्रतिवादीने सुध्दा त्याच्या उलटतपासात ही बाब मान्य केली आहे की, त्याचे व वादीचे दरम्यान जो ॲटो खरेदी विक्रीचा करारनामा झाला होता त्या नुसार त्याने रु.३,७६,०००/– या मोबद्ल्यात वादीचे वाहन खरेदी करण्याचे ठरले होते व त्यापैकी त्याने केवळ रु.२६,०००/– ही इसाराची रक्कम वादीला दिली आहे. तसेच त्याने ही बाब सुध्दा मान्य केली की, सदर करारनाम्यानुसार प्रतिवादीला चोलामंडलम फायनान्सच्या कर्जाच्या फेडीसाठी दरमहा रु.१०,०००/– या रकमेच्या एकूण ३५ किस्त भरायच्या होत्या व त्यापैकी एकही किस्त प्रतिवादीने भरलेली नाही. तसेच प्रतिवादीने ही बाब सुध्दा मान्य केली आहे की, त्याने वादीचा वादातील ॲटो गोलु भिकु अजनेरीया याला विकला आहे व सदर गोलु अजनेरीया याचे कडून मिळालेल्या मोबद्ल्यातील कोणतीही रक्कम त्याने वादीला दिलेली नाही. सदर परीस्थतीत भारतीय पुरावा कायद्याचे कलम ५८ अन्वये प्रतिवादीला मान्य असलेल्या बाबी हया या दाव्यात सिध्द झाल्या आहेत, असे गृहीत धरणे आवश्यक आहे. त्यामुळे अभिलेखावरील पुराव्याचे उपरोक्त एकंदरीत विवेचन विचारात घेता प्रस्तुत दाव्यात वादीने त्याचा ॲटो प्रतिवादीला रु.३,७६,०००/– या मोबद्ल्यात निशाणी क्रं.४३ या कराराअन्वये विक्री केला परंतु प्रतिवादीने त्या कराराची पुर्तता केली नाही व सदर ॲटोवर थकीत असलेली कर्जाची रक्कम रु.३,५०,०००/– ही चोलामंडलम फायनान्सकडे भरलेली नाही, ही बाब सिध्द होत आहे.

२०. तसेच उपरोक्त परीस्थीतीत केवळ प्रतिवादीच्या चुकीमुळे वादीला त्याचे ॲटोवरील कर्जाची थकीत रक्कम भरावी लागली आहे व तरी देखील त्याला त्याच्या ॲटोचा वापरसुध्दा करता आला नाही, या बाबीसुध्दा सिध्द होत आहे. त्यामुळे सदर परीस्थितीत वादी हा त्याचे मागणीप्रमाणे सदर ॲटोच्या मोबद्ल्याची रक्कम रु.३,५०,०००/– ही रक्कम व्याजासह मिळण्यास पात्र आहे. वादी व प्रतिवादी यांचे दरम्यानच्या व्यवहाराचे स्वरुप विचारात घेता प्रतिवादीने वादीला सदर रक्कम

रु.३,५०,०००/– ही रक्कम दिनांक २७.०५.२०१५ रोजी पासून ते सदर रक्कम वसुल होईपर्यंत प्रतिसाल ६ टक्के या व्याज दराने देणेबाबत आदेश पारीत करणे न्यायोचित होणार आहे. सबब मी मुद्दा क्रमांक १ ते ६ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित असुन मुद्दा क्रमांक ७ च्या निष्कर्षार्थ पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादीचा दावा खर्चासह मंजूर करण्यात आला.

२. प्रतिवादीला आदेशीत करण्यात येते की, त्याने वादीला नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रु.३,५०,०००/– ही रक्कम दिनांक २७.०५.२०१५ रोजी पासून ते सदर रक्कम वसुल होईपर्यंत प्रतिसाल ६ टक्के या व्याज दराने व्याजासह द्यावी.

३. येणेप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.

KALE MAHESH SHRIDHARRAO
Digitally signed by KALE MAHESH SHRIDHARRAO
Date: 2026.03.07 17:43:17 +0530

दिनांक :०६/०३/२०२६.

( महेश एस. काळे ),
**सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,**
**अकोट.**

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | S. G. Jaiswal |
| Court Name | : | Jt. Civil Judge, S.D., Akot. |
| Date | : | 06/03/2026. |
| Order Signed by P.O on | : | 07/03/2026. |
| Order Uploaded on | : | 07/03/2026. |